असा. क्र. ६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५





# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी ४, २००५ / पौष १४, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका


पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.**––महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. .. १८-२०


दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२००४ चा महा. अध्या. ५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अध्यादेश, २००४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा केला आहे), हा दिनांक २९ मार्च २००४ रोजी प्रख्यापित केला होता ;



[ **किंमत**—रुपये ९.०० ]

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २४ मे २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त अध्यादेश हा राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये मांडण्यात आला होता आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठीचे विधेयकसुद्धा दिनांक २६ मे, २००४ रोजी, सन २००४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ म्हणून महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते आणि दिनांक ९ जून, २००४ रोजी ते महाराष्ट्र विधानपरिषदेने मंजूर केले होते. तथापि, उक्त विधेयक हे राज्य विधानसभेमध्ये मंजूर होऊ शकले नाही आणि दिनांक ११ जून, २००४ रोजी राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती झाली ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर म्हणजेच दिनांक ४ जुलै, २००४ रोजी उक्त अध्यादेश अमलात असण्याचा बंद झाला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अमलात असणे चालू ठेवणे इष्ट वाटले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असणे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी दिनांक २९ जुलै, २००४ रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. २१.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २९ मार्च, २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ८८ मधील, पोट-कलम (३) मध्ये ; जेथे जेथे " एक हजार रुपयांपेक्षा " हा मजकूर आला असेल तेथे तेथे, त्याऐवजी " एक हजार आणि दोनशे रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७७ चा महा. अध्या. २८.

२००४ चा महा. अध्या. २१. **३.** (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१ याचे निरसन व व्यावृत्ती

(२) अशा प्रकारे अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा काढलेला कोणताही आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट, केलेली कार्यवाही किंवा काढलेली अधिसूचना किंवा यथास्थिति, काढलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई